<u>सं. फौ. ख. क्र.८५९/२०२१</u> निशाणी क्र.२३

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्र.४ यांचा शपथेवर जबाब</u>**
**<u>मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,</u>**

नाव – किशोर रायभान माळी

वय – ५८ वर्षे, व्यवसाय – खाजगी नोकरी

पत्ता – रा. गजानन नगर, डाबकी रोड, अकोला
ता. जि. अकोला.

**<u>सरकारतर्फे सरकारी वकिल श्री. के. एस. ताकवाले यांचे मार्फत सरतपास सुरुः</u>**

१. दि.२७.०१.२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. सुमारास माझे वडील नामे रायभान माळी हे शेतामध्ये पायी जात होते. माझे वडील भाकराबाद येथे पोहोचल्यानंतर तेथे उभे असलेले एक टाटा एएस. गाडी क्र. एमएच३०–ए.बी.–०५९४ ही पाठीमागे रिव्हर्स घेत असताना सदर चालकाने ती गाडी निष्काळजीपणे चालवून माझ्या वडीलांच्या अंगावरुन घातली. सदरची घटना ही माझा भाऊ सचिन रायभान माळी याने मला फोन करुन सांगितली. त्यामुळे मी अपघातस्थळी गेलो असता तेथे माझे वडील टाटा एएस. गाडी क्र. एमएच३०–ए.बी.–०५९४ च्या पाठीमागील चाकाखाली दबलेले होते. मी सदर अपघाताबाबत माझा भाऊ सचिन यास विचारणा केली असता त्याने सदर गाडीचा चालक नितीन भाकरे असल्याचे सांगितले.

२. सदर घटनास्थळी पोलीस आले त्यांनी पंचनामा केला व माझ्या वडीलांना शवविच्छेदन करण्याकरीता अकोला येथे नेले. सदर अपघाताबाबत पोलीसांनी माझी चौकशी करुन माझा जबाब नोंद केला होता.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एन. एन. जामोदे यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

३. सचिन माळी हा माझा सख्खा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघात मी प्रत्यक्षात पाहिला नसल्यामुळे मला त्याबाबत काहीही माहिती नाही. पोलीसांनी माझी चौकशी घटनेच्या दुसऱ्या दिवशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की,

सरतपासादरम्यान कथन केलेल्या सर्व बाबी खोट्या सांगितलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझी चौकशी केली नाही व माझा जबाब नोंद केला नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २६.०८.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.08.28 13:56:59 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

प्रमाणपत्र

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २६/०८/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २६/०८/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २८/०८/२०२५ |